

# भुयारी मेट्रोच्या पहिल्या रेल्वेचे डबे मुंबईत दाखल

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) - कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावरील मेट्रो-३ प्रकल्पाच्या पहिल्या मेट्रो रेल्वेचे पहिले चार डबे आज पहाटे मुंबईत दाखल झाले. आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथून १४०० किलोमीटर अंतर १३ दिवसांत कापून हे डबे ट्रेलर्सवरून मुंबईत पोहोचले. आणखी चार डबेही लवकरच मुंबईत पोहचतील असे मुंबई मेट्रो रेल महामंडळाकडून (एमएमआरसी) सांगण्यात आले.

मेट्रो रेल्वेच्या प्रत्येक डब्याचे वजन ४२ टन इतके आहे. त्यामुळे ते डबे आणण्यासाठी विशेष प्रकारच्या ट्रेलरचा वापर करण्यात आला. आता हे डबे जोडून सारीपूत नगरातील तात्पुरत्या जागेत पूर्ण रेल्वेगाडी बनवली जाईल. तिथेच चाचणीसाठी ट्रॅकसुद्धा उपलब्ध आहेत. सारीपूत नगर ते मरोळ नाका मेट्रो स्थानकापर्यंतच्या तीन किलोमीटर लांबीच्या ट्रॅकवर चाचण्या घेण्यात येणार आहेत.